# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.**
**दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.**


मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

**जा.क्र.मनपा/आस्था/** 3097 /2023-24 दि. 14/03/2024

वाचले

1. शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक - सफाई-2011/प्र.क्र.327/विघयो-2 दिनांक: 21 ऑक्टोबर, 2011
2. शासन निर्णय क्रमांक: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सफाई-2015/प्र.क्र.268/महामंडळे दिनांक: 11 मार्च, 2016
3. शासन परिपत्रक क्रमांक : नगर विकास विभाग, लापास-2019/प्र.क्र.63/नवि-6 दिनांक: 10 फेब्रुवारी, 2020
4. श्री. मयूर सुरेश सोलंकी यांचा नोकरी अर्ज दिनांक 06/03/2023.
5. मा. आयुक्त सो. यांची दि. 16/02/2024 रोजीची मान्यता.
6. पोलीस निरीक्षक/विशेष शाखा, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडील जा.क्र./विशा/चारित्र्य पडताळणी/2024-3225 दि. 13/03/2024 रोजीचा चारित्र्य पडताळणी अहवाल.
7. जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र क्रमांक ओपिडी क्र.18876 दिनांक 04/03/2024 अन्वये वैद्यकीय अहवाल.
8. मामलेदार ऑफिस, हलोळ,पंचमहाल्स यांचेकडील दि.03/01/2023 रोजीचे जात प्रमाणपत्र.

---

विषय :- लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारस कर्मचारी नियुक्तीबाबत.
श्री. मयूर सुरेश सोलंकी

आदेश,

श्री. डाया नाना सोलंकी हे मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर सफाई कामगार या पदावर आरोग्य विभागात काम करीत होते. त्यांना कार्यालयीन आदेश क्रमांक जा.क्र.मनपा/आस्था/321/2019-20, दिनांक 29/05/2019 अन्वये त्यांना महानगरपालिका सेवेतून दि. 31/05/2019 पासून नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात आले आहे. सबब त्यांच्या जागेवर लाड कमिटीच्या शिफारशीनुसार नोकरी मिळणेसाठी त्यांचा नातू श्री. मयूर सुरेश सोलंकी यांनी दिनांक 06/03/2023 रोजी अर्ज सादर करून त्या अनुषंगाने नियुक्तीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. त्यांचा पूर्व चारित्र्य व वर्तणूक पडताळणी अहवाल पोलीस निरीक्षक/विशेष शाखा, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडील जा.क्र./विशा/चारित्र्य पडताळणी/2024-3225 दि. 13/03/2024 अन्वये प्राप्त झाला असून तो अनुकूल आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र क्रमांक ओपिडी क्र. 18876 दिनांक 04/03/2024 अन्वये त्यांचा वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त झाला असून तो अनुकूल आहे.

श्री. मयूर सुरेश सोलंकी यांनी सादर केलेली कागदपत्रे तसेच शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक-सफाई-2011/प्र.क्र.327/विघयो-2 दिनांक: 21 ऑक्टोबर, 2011 च्या शासन परिपत्रकातील तरतुदीस अधिन राहून श्री. मयूर सुरेश सोलंकी यांना वारसा पद्धतीने मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर "सफाई कामगार" या पदावर, सेवेत हजर झाल्याच्या तारखेपासून प्रथमतः दोन वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी पे लेवल S-1 15000-47600 या वेतनश्रेणीत पूर्णता तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.**
**दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.**


मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

**जा.क्र.मनपा/आस्था/** 3097/2023-24 **दि.** 14/03/2024

श्री. मयूर सुरेश सोलंकी यांना निःसंदिग्धपणे समज देण्यात येते की, त्यांची मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर “सफाई कामगार” या पदावर करण्यात आलेली नियुक्ती ही खालील अटी व शर्तीवर करण्यात आली असून, सेवा कालावधीत या अटी व शर्ती त्यांचेवर बंधनकारक राहतील.

अटी व शर्ती :-

१. सदरची नियुक्ती ही रुजू तारखेपासून प्रथमतः दोन वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी करण्यात येत आहे.

२. परिविक्षाधीन कालावधीन त्यांचे कामकाज असमाधानकारक आढळल्यास विनापरवाना गैरहजर राहिल्यास, गैरवर्तणूक आढळल्यास, नेमून दिलेल्या कामात टाळाटाळ केल्यास, उद्धटपणाची वर्तणूक केल्यास, कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता केव्हाही कामावरून कमी केले जाईल.

३. सदरची नियुक्ती ही त्यांनी सादर केलेल्या शैक्षणिक अर्हता, तांत्रिक पात्रता, जातीविषयक दाखल्याच्या सत्यप्रती पाहून तसेच वारसाबाबत सादर केलेली कागदपत्रे पाहून दिलेली आहे. त्यामध्ये व मूळ दाखल्यामध्ये वा प्रतिज्ञापत्राच्या वस्तुस्थितीमध्ये तफावत आढळल्यास त्यांना सेवेतून कमी केले जाईल.

४. महापालिका सेवेत हजर होताना शैक्षणिक अर्हता, तांत्रिक पात्रता, जातीविषयक, शाळा सोडल्याबाबत वयाचे व इतर दाखले (ओरिजिनल सर्टिफिकेट) आणावेत त्याशिवाय हजर करून घेतले जाणार नाही.

५. महापालिका सेवेत हजर होताना नव्याने काढलेल्या आपल्या छायाचित्राच्या (फोटोच्या) शासकीय राजपत्रित अधिकाऱ्याने/नोटरी यांनी प्रमाणित केलेल्या दोन प्रती सादर कराव्या लागतील त्याशिवाय हजर करून घेतले जाणार नाही.

६. नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत महानगरपालिकेच्या प्रशासन विभागात हजर व्हावे लागेल. मुदतीत हजर न झाल्यास आपणांस नोकरीची आवश्यकता नाही. असे गृहित धरून सदरची नियुक्ती रद्द करण्यात येईल व मुदतीनंतर कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७. आपण दिलेली माहिती खोटी आहे असे निदर्शनास आल्यास व तशी खात्री झाल्यास कोणत्याही प्रकारची चौकशी न करता अथवा नोटीस न देता महापालिका सेवेतून त्वरीत कमी केले जाईल व त्याबाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

८. महापालिकेने स्वीकारलेले सेवानियम अथवा सेवानियमाबाबत केलेले उपविधी किंवा सध्या अस्तित्वात असलेले सेवानियम किंवा भविष्यकाळात तयार होणारे नियम आपल्यावर बंधनकारक राहतील.

९. महापालिका सेवा सोडण्यापूर्वी रीतसर एक महिना आगाऊ लेखी नोटीस मा. आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचे नावे द्यावी लागेल. लेखी नोटीस न दिल्यास एक महिन्याच्या वेतना इतकी रक्कम महापालिका कोषागारात रोख भरावी लागेल. त्या शिवाय दिलेला राजीनामा मंजूर केला जाणार नाही. त्याचप्रमाणे महापालिकेचे इतर येणे असल्यास ते रोख भरावे लागेल.

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, ४०१ १०१.
दुरध्वनी क्र. २८१९२८२८/२८१९३०८७.

जा.क्र.मनपा/आस्था/ 3097/2023-24 दि. 14/03/2024

१०. शासन निर्णय क्र.अ) अंनियो/1005/126/सेवा-8, दि. 31 ऑक्टोबर 2005 ब) अंनियो/1007/18/सेवा-4, दि.17 जुलै 2007 क) अंनियो/2012/प्र.क्र.26/सेवा-4, दि.21 ऑगस्ट 2014 या निर्णयानुसार नवीन (परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना) राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

११. शासन परिपत्रक क्रमांक सीडीआर-1010/प्र.क्र.24/पुनर्वाधणी70/11 दिनांक 11 नोव्हेंबर 2014 नुसार भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घ्यावी लागेल.

१२. पदावरील हजर झाल्याची तारीख सेवाज्येष्ठतेकरिता धरण्यात येईल.

१३. शासन निर्णय क्र. सफाई 2015/प्र.क्र. 268/महामंडळे, मंत्रालय, मुंबई 32, दि.11 मार्च 2016 चे तरतुदीनुसार सफाई कर्मचारी म्हणून सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात यावा असे नमूद केले आहे.

१४. महाराष्ट्र शासन परिपत्रक जा.क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दि.01/07/2005 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नियम-2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ या आज्ञापत्रका सोबत जोडला आहे. तो उमेदवाराने नेमणुकीच्या खात्याकडे रुजू होताना भरून देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास संबंधित खात्याने हजर करून घेवू नये.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

मारुती गायकवाड
उपायुक्त (मु.)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रति,
श्री. मयूर सुरेश सोलंकी
आंबेडकर नगर झोपडपट्टी,
उत्तन रोड, रामदेव पीर मंदिर जवळ,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे ४०११०१

प्रत :-

१) मुख्य लेखाधिकारी, मिरा-भाईंदर महानगरपालिका
२) मुख्य लेखापरीक्षक, मिरा-भाईंदर महानगरपालिका
३) आस्थापना अधिक्षक, मिरा-भाईंदर महानगरपालिका
४) निवड नस्ती, मिरा-भाईंदर महानगरपालिका

टीप : सदर कर्मचाऱ्याचा परिविक्षाधीन कालावधी संपण्यापूर्वी पंधरा दिवस अगोदर त्यांचा कामकाज अहवाल पुढील नियुक्तीबाबत स्वयंस्पष्ट शिफारशीने पाठविण्याची दक्षता घ्यावी.